# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ९५ वी बैठक दिनांक १९ जून २०१७

## ठराव

मा. ना. गिरीष महाजन, मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ,पुणे यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ९५ वी बैठक शुक्रवार दि. १९ जून २०१७ रोजी मा. मंत्री, जलसंपदा यांचे मंत्रालयीन दालन क्र. ३०३, तिसरा मजला, मंत्रालय, मुंबई-३२ येथे संपन्न झाली.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व निमंत्रित अधिकारी उपस्थित होते.

**सन्माननीय सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. ना.श्री. विजय शिवतारे | ... | राज्यमंत्री, जलसंपदा व उपाध्यक्ष |
| २. | मा.श्रीमती वन्दना कृष्णा | ... | प्रधान सचिव (वित्त) व सदस्य |
| ३. | मा. श्री. अपूर्व चंद्रा | ... | प्रधान सचिव (नियोजन) व सदस्य |
| ४. | मा. श्री. च.आ. बिराजदार | ... | सचिव (ज.व्य. व ला.वि) व सदस्य |
| ५. | श्री. रा. ब. घोटे | ... | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |

**निमंत्रित अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. ता. ना. मुंडे | ... | मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग ,पुणे |
| २. | श्री. सं. दे. कुलकर्णी | ... | मुख्य अभियंता (विप्र), जलसंपदा विभाग ,पुणे |
| ३. | श्री. विरेंद्र जाधवराव | ... | मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मकृखोविम, पुणे |
| ४. | श्री. म. गु. वानखेडे | ... | अधीक्षक अभियंता,मकृखोविम, पुणे |

बैठकीच्या सुरुवातीस कार्यकारी संचालक व सदस्य सचिव यांनी मा. अध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे स्वागत केले. तद्नंतर बैठकीत विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आले.

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ९५ वी बैठक दिनांक १९ जून २०१७

ठराव क्र. ९५/१

"ठराव करण्यात येतो की, दि. २९.७.२०१६ रोजी संपन्न झालेल्या नियामक मंडळाच्या ९३ व्या बैठकीत पारित केलेल्या ठरावावर करण्यात आलेल्या कार्यवाही अहवालाचे नियामक मंडळाने अवलोकन केले आहे."

ठराव क्र. ९५/२

"ठराव करण्यात येतो की, दि. १७/०३/२०१७ रोजी संपन्न झालेल्या नियामक मंडळाच्या ९४ व्या बैठकीत पारित करण्यात आलेल्या ठरावापैकी ठराव क्र. ९४/२ व ९४/१९ या बाबत कोणतेही ठराव पारित झालेले नसल्याने हे ठराव वगळता उर्वरित ठराव कायम करण्यात आले व ठराव क्र. ९४/१४ व ९४/२५ दुरुस्तीसह कायम करण्यात आले."

ठराव क्र. ९४/१४

"ठराव करण्यात येतो की, शासन जलसंपदा विभाग निर्णय क्र.संकीर्ण २०१५/(४४/१५) सिंव्य(धोरण) दिनांक १७/११/२०१६ नुसार पुर्ण झालेल्या, प्रगतीपथावरील व नियोजित सिंचन प्रकल्पातून (अ) पिण्यासाठी १५ टक्के (ब) औद्योगिक वापरासाठी १० टक्के या मर्यादेमधील बिगर सिंचन पाणी आरक्षण प्रस्तावास मान्यता देण्याचे अधिकार कार्यकारी संचालक यांचे शिफारशीनुसार मा. राज्यमंत्री, जलसंपदा तथा उपाध्यक्ष, मकृखोविम, पुणे यांचे सहमतीने मा.मंत्री, जलसंपदा तथा अध्यक्ष, मकृखोविम,पुणे यांना प्रदान करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ९४/२५

"ठराव करण्यात येतो की, प्रकल्पांचे मंजुर सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावात अंतर्भूत असलेल्या घटकांच्या किंमतीचे मर्यादित यापूर्वी निर्माण झालेले मंजुर निविदेवरील वाढीव दायित्व व चालु निविदेवरील वाढीव दायित्व मंजुरीचे अधिकार हे निविदा कामाच्या व्याप्तीच्या मर्यादेत (Within the Scope of Work) ५ टक्के पर्यंत दायित्व प्रस्तावांना मान्यता देण्याचे अधिकार महामंडळाच्या मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या सहमतीने महामंडळाच्या कार्यकारी संचालकांना राहतील. मात्र तत्पूर्वी करारावरील एकूण वाढीव खर्च ५% चे मर्यादेत राहील याबाबतचे प्रमाणपत्र मुख्य अभियंता यांनी देणे गरजेचे असेल व याबाबत मुख्य अभियंता हे जबाबदार असतील. तसेच कलम ३७/३८ तसेच अतिरिक्त बाबीमुळे होणारी कराराची किंमतवाढ (भाववाढ वगळून) ५% पेक्षा अधिक १५% पर्यंत च्या प्रस्तावाना मान्यता देण्याचे अधिकार कार्यकारी समितीच्या शिफारशीनुसार मा. राज्यमंत्री, जलसंपदा तथा उपाध्यक्ष, मकृखोविम, पुणे यांचे सहमतीने महामंडळाचे अध्यक्ष यांना व १५% पेक्षा अधिक होत असल्यास अशा प्रस्तावांना मान्यता देण्याचे अधिकार कार्यकारी समितीच्या शिफारशीने महामंडळाच्या नियामक मंडळास, देण्याच्या प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्याबाबत चर्चा झाली."

वरील ठरावाच्या अनुषंगाने नियामक मंडळाच्या बैठकीत विस्तृत चर्चा झाली व पारित केलेल्या ठरावात पुढीलप्रमाणे बदल करावयाचे मा. अध्यक्ष तथा मंत्री ( जलसंपदा) यांनी सुचित केले.

प्रकल्पांचे मंजुर सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावात अंतर्भूत असलेल्या घटकांच्या किंमतीचे मर्यादित यापूर्वी निर्माण झालेले मंजुर निविदेवरील वाढीव दायित्व व चालु निविदेवरील वाढीव दायित्व मंजुरीचे अधिकार हे निविदा कामाच्या व्याप्तीच्या मर्यादेत (Within the Scope of Work) ५ टक्के

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ९५ वी बैठक दिनांक १९ जून २०१७

पर्यंत दायित्व प्रस्तावांना मान्यता देण्याचे अधिकार महामंडळाच्या मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या सहमतीने महामंडळाच्या कार्यकारी संचालकांना राहतील. मात्र तत्पूर्वी करारावरील एकूण वाढीव खर्च ५% चे मर्यादेत राहील याबाबतचे प्रमाणपत्र मुख्य अभियंता यांनी देणे गरजेचे असेल व याबाबत मुख्य अभियंता हे जबाबदार असतील व दायित्व ५% पेक्षा अधिक होत असल्यास अशा प्रस्तावांना मान्यता देण्याचे अधिकार कार्यकारी समितीच्या शिफारशीने महामंडळाच्या नियामक मंडळास, देण्याच्या प्रस्तावास नियामक मंडळाची एकमताने मान्यता देण्यात येत आहे.

वरीलप्रमाणे पारित केलेल्या सुधारित ठरावातील कार्यपध्दतीस शासनाची विवक्षित मान्यता घेण्यासाठी शासनास प्रस्ताव पाठवावा असे ठरले.

प्रस्तावित मार्गदर्शक सूचना, प्रदान केलेले अधिकार व कार्यपध्दतीस म.कृ. खोरे विकास महामंडळाच्या अधिनियमातील अनुच्छेद २५ अन्वये शासनास असलेल्या अधिकारांचा वापर करुन शासन स्तरावरुन महामंडळास सूचना देण्याविषयी शासनास विनंती करण्यात यावी.

**ठराव क्र. ९५/३**

"ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाच्या लेख्यावरील मा. महालेखापाल यांचा प्रारुप अलग लेखा परिक्षण अहवालाचे अवलोकन होऊन त्यावरील अनुपालनास मान्यता देण्यात येत असून, सदर प्रारुप लेखा परिक्षण अहवालात फेरफार न होता मा. महालेखापाल यांचेद्वारे अंतिम झाल्यास महामंडळाचे सदर वार्षिक लेख्यावरील मा. महालेखापाल यांचा अलग लेखापरीक्षण अहवाल व त्यावरील सादर अनुपालन यासह मा. विधानमंडळाच्या पटलावर सादर करण्याकरिता नियामक मंडळाची मान्यता देण्यात आली."।

**ठराव क्र. ९५/४**

"ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचा सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाचा ताळेबंद व प्रकल्प प्रगती लेख्यास प्रस्तावीत वर्गीकरण सुधारणासह नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्र. ९५/५**

"ठराव करण्यात येतो की, सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठीचा महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या सुधारीत भांडवली अर्थसंकल्पास मान्यता देण्यात येऊन राज्य सार्वजनिक उपक्रम पुनर्विलोकन समितीस सादर करण्याकरिता नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्र. ९५/६**

"ठराव करण्यात येतो की, जलसंपदा विभाग शासन निर्णय दि. १७-११-२०१६ नुसार सिंचन व्यवस्थापनाचे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील भांडवली अंदाजपत्रकास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्र. ९५/७**

"ठराव करण्यात येतो की, शासन निर्णय क्र.निविदा-१२१३/(प्र.क.७३५/२०१३)/मोप्र-१ दि.७/०९/२०१५ अन्वयेच्या सुचनानुसार प्रकल्प कामाचे मंजूर नियोजन व मंजूर प्रापणसूचीचा प्रकल्पनिहाय गोषवारा तसेच निविदा स्विकृतीनुसार महामंडळस्तरावरुन देण्यात आलेले सांकेतांक याबाबतच्या अहवालाचे नियामक मंडळाने अवलोकन केले."

"मान्य"

| | |
|---|---|
| कार्यकारी संचालक<br>म.कृ.खो.वि.म, पुणे | मा.मंत्री, जलसंपदा<br>व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे |

८९



## महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ९५ वी बैठक दिनांक १९ जून २०१७

ठराव क्र. ९५/८

"ठराव करण्यात येतो की, मौजे वरुडे, ता. खेड, जि. पुणे या ग्रामपंचायतीस सार्वजनिक नळपाणी पुरवठा योजनेचे कामासाठी महामंडळाचे मालकीची ल. पा. तलाव वाफगांव, ता. खेड तलावासाठी संपादित गट नं. १७६७/२ (जुना गट नं. २४०९/२) मधील ३ गुंठे जागेचे चालू शासकीय मुल्य अर्जदार संस्थेकडून महामंडळास मिळणेचे अटीवर संपादित ३ गुंठे जागा जिल्हाधिकारी, पुणे यांचेमार्फत मौजे वरुडे, ता. खेड, जि. पुणे या ग्रामपंचायतीस कायमस्वरुपी हस्तांतरीत करणेचा प्रस्तावास नियामक मंडळाची कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ९५/९

"ठराव करण्यात येतो की, भामा आसखेड प्रकल्पाच्या एकूण पाणीवापरापैकी ७५ टक्के पाणी बिगर सिंचनासाठी आरक्षित झाले आहे. तसेच प्रकल्पाच्या एकूण २३११० हे. लाभक्षेत्रापैकी १९६४५ हे. लाभक्षेत्र लाभधारकांच्या मागण्यांनुसार वगळण्यात आले आहे. तसेच उर्वरित क्षेत्रापैकी १८८५ हेक्टर क्षेत्र अस्तित्वातील को. प. बंधाऱ्याद्वारे सिंचनाखाली येत आहे. त्यामुळे यापुढे डाव्या व उजव्या कालव्यांची उर्वरित कामे करणे आर्थिकदृष्टया किफायतशीर ठरणार नाही. यास्तव भामा आसखेड प्रकल्पाचे उजवा व डावा कालवा रद्द करण्यास नियामक मंडळ शासनास शिफारस करीत आहे."

ठराव क्र. ९५/१०

"ठराव करण्यात येतो की, जमीन खंडाने देण्यापुर्वी महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका १९८४ मधील परिशिष्ट १७ नुसार उपलब्ध होणाऱ्या गाळपेर जमिनीबाबत संबधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या सहमतीने कार्यवाही करण्याचे आदेश तसेच सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका १९८४ मधील परिशिष्ट २४८ नुसार जमिन लागवडी प्रयोजनासाठी भाडेपट्ट्याने देताना एका वेळी पाच वर्षापेक्षा अधिक मुदतीचा असता कामा नये या सुचनेच्या अधिन राहून खालील प्रमाणेच्या भाडेपट्ट्याच्या प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

(१) गौडवाडी सहकारी सामुदायिक शेती संस्था मर्या. गौडवाडी या संस्थेस २०१.२० एकर क्षेत्र रु.३७१०प्रति हेक्टरी प्रति वर्ष दराने ५ वर्षे मुदतीने (दि.१०.१०.१६ ते ९.१०.२०२१)

(२) सोमवाडी सहकारी सामुदायिक शेती संस्था मर्या. सोमवाडी या संस्थेस ३६३.१ एकर क्षेत्र रु.३७१० प्रति हेक्टरी प्रति वर्ष दराने ५ वर्षे मुदतीने (दि.१०.१०.१६ ते ९.१०.२०२१).

(३) वरील दोन्ही प्रस्तावातील निश्चित केलेला रु.३७१० प्रती हेक्टरी प्रति वर्ष हा दर आधारभुत मानून या दरात दरवर्षी १० टक्के प्रमाणे चक्रीय पद्धतीने वाढ करावी."

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ९५ वी बैठक दिनांक १९ जून २०१७

**ठराव क्र. ९५/११**

**"ठराव करण्यात येतो की, नविन मुठा उजवा कालवा कि.मी. ० ते ३४ हा पुणे व परिसरातून जात असल्याने, नागरीकरणाचा विचार करता सदर लांबीतील कालवा रद्द करून त्याऐवजी पर्यायी भुयारी मार्गाचे (बोगद्याचे) काम E.P.C. (Engineering, Procurement & Construction) करारनाम्याद्वारे करण्यासाठी EOI (Expression of Interest) मागविण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

तद्नंतर मा. अध्यक्ष यांचे परवानगीने कार्यकारी संचालक व सदस्य सचिव यांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

**"मान्य"**

**"मान्य"**

**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

**मा.मंत्री, जलसंपदा**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**